"महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र"आयुक्तालयातील आयुक्त यांना "विभाग प्रमुख व नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांक : आकृति-२०१०/प्र.क्र.७३/मग्रारो-३.
दिनांक: २७ डिसेंबर, २०११

वाचा : शासन निर्णय क्रमांक : आकृति-२०१०/प्र.क्र.७३/मग्रारो-३, दिनांक १५ सप्टेंबर,२०११.

प्रस्तावना :-

महाराष्ट्रात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे राज्य स्तरीय काम पाहण्यासाठी शासन निर्णय क्रमांक आकृति-२०१०/प्र.क्र.७३/मग्रारो-३, दिनांक १५ सप्टेंबर,२०११ अन्वये नागपूर येथे स्वतंत्र आयुक्तालय निर्माण करण्यात आले आहे.या आयुक्तालयासाठी एकूण १७ पदे कायमस्वरुपी मंजूर करण्यात आली आहेत. या आयुक्तालयाचे कामाचे स्वरुप व आवाका पाहता "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र"आयुक्तालयातील आयुक्त यांना विभाग प्रमुख व नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती . याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

शासन निर्णय :-

महाराष्ट्रात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्यभर यशस्वीरित्या राबविण्यासाठी राज्यस्तरावर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र आयुक्तालयातील आयुक्त यांना **" विभाग प्रमुख व नियंत्रण अधिकारी "** म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२. हे आदेश शासन निर्णय वित्त विभाग क्र. विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/२००८/विनियम, दिनांक १५ मे,२००९, भाग पहिला-उपविभाग-एक-अ.क्र.१,नि.क्र.२ अन्वये प्रदान केलेल्या अधिकीरनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र राज्याच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१११२२७०७२२२४४१२४४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(बा.बा.नारायणकर)
उप सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,
१) मा. मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव.
२) मा. राज्यमंत्री (रोहयो), यांचे खाजगी सचिव.

३) प्रधान सचिव (रोहयो) मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), मंत्रालय, मुंबई.
६) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आयुक्तालय, महाराष्ट्र, नागपूर.
७) सर्व विभागीय आयुक्त,
८) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१०) अप्पर जिल्हाधिकारी, मुख्यालय जव्हार, जि. ठाणे.
११) सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
१२) सर्व उपायुक्त (मग्रारोहयो).
१३) सर्व उप जिल्हाधिकारी (मग्रारोहयो).
१४) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१५) महालेखापाल -१/२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१६) संचालक, (लेखा व कोषागारे) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७) सर्व जिल्हा कोषगार अधिकारी, (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून),
१८) वित्त विभाग, (कार्या-व्यय-८/ वि.सु.-१/विनियम)
१९) सर्व उप सचिव /अवर सचिव/कक्ष अधिकारी (मग्रारोहयो)
२०) सहाय्यक संचालक (लेखा)/ लेखाधिकारी/संशोधन अधिकारी.
२१) कार्यासन-मग्रारो-१ (सारसंग्रह)
२२) कार्यासन (मग्रारो-३), (निवडनस्तीसाठी